सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ०३/०२/२०२५.

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्र. शिकाना-१२२४/प्र.क्र.०१/पोल-२ दि.३१ जानेवारी २०२५

**विषय :-** विधानमंडळ अधिवेशन कालावधीत Point of Information च्या अनुषंगाने ठाणेनगर पोलीस स्टेशन येथे दाखल गु.र.क्र.७४२/२०२४ बाबत सखोल चौकशी करण्याकरीता विशेष तपास पथक (SIT) स्थापना करणेबाबत.

*******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्र. शिकाना-१२२४/प्र.क्र.०१/पोल-२, दि.३१ जानेवारी २०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०१३११७४१४५८६२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी .

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई
कार्यासन अधिकारी,का.क्र.२०

प्रत,
अपर पोलीस महासंचालक, (का.व.सु), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक (का.व.सु), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व.सु), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत:-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**विधानमंडळ अधिवेशन कालावधीत Point of Information च्या अनुषंगाने ठाणेनगर पोलीस स्टेशन येथे दाखल गु.र.क्र.७४२/२०२४ बाबत सखोल चौकशी करण्याकरिता विशेष तपास पथक (SIT) स्थापन करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : शिकाना-१२२४/प्र.क्र.०१/पोल-२,**
दुसरा मजला, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.
दिनांक : ३१ जानेवारी २०२५.

**प्रस्तावना:** - महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२४ च्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये विधानपरिषद सभागृहात श्री.प्रविण दरेकर, वि.प.स. यांनी "राज्याचे सध्याचे मुख्यमंत्री (तत्कालीन विरोधी पक्षनेते) आणि सध्याचे उप मुख्यमंत्री (तत्कालीन नगरविकास मंत्री) यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करुन त्यांना अडकविण्याचा कट रचल्याबाबत" या विषयावर Point of Information द्वारे मुद्दा उपस्थित केला होता. त्यानुषंगाने वरीष्ठ आयपीएस अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली SIT गठीत केली जाईल असे आश्वासन शासनाकडून देण्यात आले आहे.

**शासन निर्णय:** -

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२४ च्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये श्री. प्रविण दरेकर, मा.वि.प.स. यांनी विधानपरिषदेमध्ये *"राज्याचे सध्याचे मुख्यमंत्री (तत्कालीन विरोधी पक्षनेते) आणि सध्याचे उप मुख्यमंत्री (तत्कालीन नगरविकास मंत्री) त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करून त्यांना अडकविण्याचा कट रचल्याबाबत"* या आशयाचा विषय Point of Information द्वारे उपस्थित केला होता. ठाणेनगर पोलीस स्टेशन, ठाणे पोलीस आयुक्तालय येथे पोलीस अधिकारी यांनी पदाचा दुरूपयोग करून फेरतपास चालू करून फसवणूक केली अशा आशयाच्या फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गु.र.क्र.७४२/२०२४ दाखल करण्यात आला आहे. त्यानुषंगाने, या प्रकरणी सखोल चौकशी करण्याकरिता **श्री.सत्यनारायण चौधरी, पोलीस सह आयुक्त, कायदा व सुव्यवस्था, बृहन्मुंबई** यांच्या अध्यक्षतेखाली **"विशेष तपास पथक (SIT)"** स्थापन करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर विशेष तपास पथकामध्ये खालील नमूद अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत आहे:-

| **अ. क्र.** | **नाव** | **पदनाम** | **सध्याच्या नेमणूकीचे ठिकाण** |
|---|---|---|---|
| १ | श्री. राजीव जैन | पोलीस उपमहानिरीक्षक | राज्य राखीव पोलीस दल (SRPF), मुंबई. |
| २ | श्री.नवनाथ ढवळे | पोलीस उप आयुक्त | परिमंडळ-६ (Zone 6), बृहन्मुंबई |
| ३ | श्री.आदिकराव पोळ | सहायक पोलीस आयुक्त | मुंबई शहर. |

२. पोलीस उप आयुक्त, श्री.लक्ष्मीकांत पाटील यांच्या तपासाबाबत उपस्थित केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तपास करुन त्याबाबत शासनास शिफारस करण्याबाबतची कार्यवाही विशेष तपास पथकामार्फत (SIT) करण्यात यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी सभागृहात सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेले सर्व मुद्दे चौकशीत विचारात घेतले जातील तसेच या प्रकरणाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांना उपस्थित करावयाचे अधिकचे मुद्दे यासाठी ३० दिवसांची मुदत देण्यात येत आहे.

४. सदर विशेष तपास पथकासाठी (SIT) आवश्यक मनुष्यबळ पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी उपलब्ध करुन द्यावे.

५. उपरोक्त विशेष तपास पथकाने चौकशीची कार्यवाही त्वरीत पूर्ण करुन त्याचा अहवाल शासनास सादर करावा.

६. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०१३११७४१४५८६२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VENKATESH MADHAV BHAT

Digitally signed by VENKATESH MADHAV BHAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=5f0272b97156a5d2812bad6725ca46fb2671d1da08208cfdd6677fac0afd6bf2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6E277C9088A4CB8B53E535A4642A6800B908C5DBDB3A63175760874EBA717AE1, cn=VENKATESH MADHAV BHAT
Date: 2025.01.31 17:43:03 +05'30'

**(व्यंकटेश भट)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा.मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव
३. मा.उपमुख्यमंत्री (अर्थ व नियोजन) यांचे प्रधान सचिव
४. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास व इतर) यांचे प्रधान सचिव

५. मा. विरोधी पक्षनेता विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
९. श्री.सत्यनारायण चौधरी, पोलीस सह आयुक्त, कायदा व सुव्यवस्था, बृहन्मुंबई.
१०.निवड नस्ती (पोल-२).